# यावल महाविद्यालयात एम.बी.ए. प्रवेश प्रक्रिया सुरु

यावल (प्रतिनिधि) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची एम.बी. ए. प्रथम वर्षा साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. (एम बी ए ऑनलाईन एन्ट्रन्स टेस्ट) प्रवेश परीक्षा ची अंतिम तारीख 15 सप्टेंबर 2021 ही आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ycmou.digitaluniversity.ac सदर दिलेल्या लिंक वर प्रवेश परीक्षा फार्म भरायचा आहे. ऑनलाईन प्रवेश परीक्षा देण्यापूर्वी उमेदवारांनी

*पुढील सूचनांचे पालन करावे*

1.प्रवेश परीक्षा नोंदणी करून परीक्षा शुल्क 500/- रुपये ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहेत.

2.प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी केल्यानंतर उमेदवारास सराव चाचणी (मॉक टेस्ट) आणि मुख्य प्रवेश परीक्षा (मेन एंट्रेंस टेस्ट) देता येईल.

3. प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी, पुढील प्रवेशासाठी महाविद्यालयात संपर्क साधावा.